सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT


# जि.प. अध्यक्ष-उपाध्यक्षांनी घेतली प्रशासक काळातील खर्चाची झडती

- बांधकाम विभागासह अर्थ विभागाची अध्यक्ष उपाध्यक्षांनी घेतली आढावा बैठक
- नूतन अध्यक्ष दीपक वैद्य यांनी आढावा बैठकीत जि.प.प्रशासनाला दिल्या सूचना






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेतील नव्याने पदभार स्वीकारल्यानंतर अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी बांधकाम विभागासह अर्थ विभागाची संयुक्त आढावा बैठक घेतली. या बैठकीत प्रशासक कार्यकाळात झालेल्या खर्चाचा सखोल तपास करण्याचे निर्देश देत पारदर्शक कारभारावर भर देण्यात आला.

बैठकीदरम्यान अध्यक्ष वैद्य यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना स्पष्ट सूचना देत, प्रशासक कार्यकाळात विविध विभागांत झालेल्या खर्चाची तपशीलवार माहिती सादर करण्याचे आदेश दिले. निधीचा वापर कोणत्या कामांसाठी आणि कितपत परिणामकारक झाला, याचा लेखाजोखा सादर करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनीही विकासकामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असे स्पष्ट करत कामकाजात पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करण्याची गरज व्यक्त केली. या बैठकीत बांधकाम कामांची प्रगती, प्रलंबित प्रकल्प, तसेच निधीच्या वापराबाबत सविस्तर चर्चा झाली. पुढील काळात विकासकामांना गती देताना आर्थिक शिस्त आणि नियोजन यांना प्राधान्य देण्याचे संकेतही या बैठकीतून देण्यात आले.

सन २०२२ पासून ते २०२५ वर्षा अखेरपर्यंत आर्थिक वर्षाची माहिती मागवण्यात आली आहे त्यामध्ये सेस फंड वाढीसाठी कोणते उपाययोजना केल्या, प्रशासक काळात सेस फंडाचे वितरण कोणकोणत्या बाबींवर झाले त्याची माहिती मागविण्यात आली. त्यामध्ये मुख्यालय व विकास काम, पंचायत समिती, आणि विश्रामगृह यावर किती प्रमाणात खर्च करण्यात आला याची इत्यंभूत माहिती मागवण्यात आली आहे. त्यावर सीईओ कुलदीप जंगम यांनी सर्व माहिती दिली जाईल असा आश्वासन दिल्याचे दीपक वैद्य यांनी सांगितले.



चैतन्य पेठे | राकेश टोळ्ये | विद्या लोलगे | अजय कुलकर्णी

# श्री भगवान परशुराम जन्मोत्सव समिती जुळे सोलापूर युवक अध्यक्षपदी चैतन्य पेठे

- उत्सव अध्यक्षपदी राकेश टोळ्ये
- महिला अध्यक्षपदी विद्या लोलगे
- स्वागताध्यक्षपदी अजय कुलकर्णी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

श्री भगवान परशुराम जन्मोत्सव समिती जुळे सोलापूरच्या युवक अध्यक्षपदी दैनिक तरुण भारतचे चैतन्य दिलीप पेठे यांची एकमताने निवड करण्यात आली. उत्सव समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार राकेश टोळ्ये, महिला अध्यक्षपदी विद्या लोलगे, स्वागताध्यक्षपदी अजय कुलकर्णी यांची निवड करण्यात आली, अशी माहिती जन्मोत्सव समितीचे समन्वयक मनोज कुलकर्णी यांनी पत्रपरिषदेत दिली.

अक्षय तृतियेच्या दिवशी जुळे सोलापुरातील केएलई स्कूल येथे श्री भगवान परशुराम जन्मोत्सव साजरी करण्यात येणार आहे. रविवार, दि.१९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता केएलई स्कूल, पतंजली मॉल, भारती विद्यापीठ, सुप्रजा पावभाजी, लक्ष्मी पंप, गोविंदश्री मंगल कार्यालय या मार्गावरुन भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. शोभायात्रेत विविध कलापथकेही सामील होणार आहेत.

शोभायात्रेत श्री भगवान परशुराम यांच्या जीवनकार्यावरील चित्रफित दाखविण्यात येणार आहे. श्रीकांत कुलकर्णी, सायली जोशी, सुधीर कुलकर्णी हे सल्लागार म्हणून काम पाहणार आहेत. श्री भगवान परशुराम यांच्या कार्याची महिती सर्वदूर पोहोचावी यासाठी वर्षभर विविध उपक्रम राबविले जाणार आहेत, असेही त्यांनी सांगितले. यावेळी विद्या लोलगे, अजय कुलकर्णी, ॲड.शर्वरी रानडे, विक्रम ढोनसळे, रवींद्र नाशिककर आदी उपस्थित होते.



# पद्म-बिझनेस वुमन अवॉर्ड, जलपरी पुरस्कार सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

येथील श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, पद्मशाली सखी संघम आणि पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पद्मशाली समाजातील कर्तृत्ववान व कर्तबगार असलेल्या महिलांना 'पद्म - बिझनेस वुमन अवॉर्ड व पद्म - जलपरी पुरस्कार' सोहळा कार्यक्रम रविवारी संध्याकाळी पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्या विणकर सभागृहात उपस्थित थाटात संपन्न झाले.

प्रारंभी पद्मशाली समाजाचे कुलदैवत श्री मार्कंडेय महामुनींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व्यासपीठावर पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, श्री मार्कंडेय रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ.माणिक गुर्रम, वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल, जिल्हा यंत्रमागधारक संघाचे खजिनदार अंबादास बिंगी, शिंदे शाळेचे माजी मुख्याध्यापक वासुदेव इप्पलपल्ली, वाचनालयाचे देवीदास गोटीपामूल, अरविंद चिन्नी, फाउंडेशनचे सुकुमार सिध्दम, दयानंद कोंडाबत्तीनी, वैकुंठम् जडल आदींची उपस्थिती होती.

सन्मान पत्र, शाल व नॅपकीन बुके असे पुरस्काराचे स्वरुप होते. उद्योजक श्रीधर सुरा यांच्यातर्फे पुरस्कार देण्यात आले. फाउंडेशन व पद्मशाली सखी संघमचे संस्थापक गौरीशंकर कोंडा यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम करण्यात आले आहे. फाउंडेशनचे उपाध्यक्ष नागेश सरगम यांनी प्रास्ताविक केले. कवयित्री रेणुका बुधारम यांनी सूत्रसंचालन करत पाहुण्यांचे स्वागत केल्या. सखी संघमच्या ममता तलकोकूल यांनी सन्मान पत्राचे वाचन केले. आभार प्रदर्शन माजी अध्यक्षा मेघा इट्टम यांनी केल्या.

## २७ मार्च रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

सोलापूर : जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर यांच्या विद्यमाने आयोजित या मेळाव्यात जिल्ह्यातील उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

या रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, आयटीआय (वेल्डर, फिटर), डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रिशियन, मशिन ऑपरेटर, बी.कॉम, एम.कॉम अशा विविध शैक्षणिक पात्रतेनुसार एकूण १४५ पेक्षा जास्त रिक्तपदे उपलब्ध असून, ती ८ उद्योजकांनी ऑनलाईन अधिसूचित केली आहेत. नोकरी इच्छुक उमेदवारांनी आपला रिझ्युमेच्या तीन प्रती व आवश्यक कागदपत्रांसह शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट पार्क चौक, सोलापूर येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

# तापमान : वाढता वाढता वाढे सोलापूरकर होताहेत घामाघूम

## थंड पेयांच्या ठिकाणी गर्दी
## पुढील दोन महिने राहणार तापमानाचा चढता पारा





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**


गेल्या दोन दिवसांपासून दुपारी उन्हाचा चटका पुन्हा चांगलाच वाढला. सोमवार, दि.२३ मार्च रोजी ३७.६ अंश सेल्सियस इतकी नोंद झाली. मध्यंतरी आभाळी वातावरण निर्माण झाल्याने तापमानाचा पारा खाली आला होता. मात्र गेल्या ४ दिवसांपासून सोलापुरात पुन्हा तापमानाचा पारा हळूहळू चढत आहे.

मार्च महिन्याच्या पहिल्या दिवसांपासूनच यंदा तापमानात वाढ होत आहे. २८ फेब्रुवारी पर्यंत ३५ अंश ते ३६ अंशापर्यंत हा पारा वाढत गेला. दरम्यान, १ मार्च रोजी पुन्हा तापमान वाढून तो थेट ३७.२ अंशावर गेला होता. मार्च महिन्यात तापमानाचा पारा चढताच होता मात्र मध्यंतरी आभाळी वातावरण निर्माण झाल्याने तापमानाचा पारा खाली आला. १७ मार्च रोजी तर ३९ अंशाच्या घरात तापमान होते. यानंतर काही दिवस ३६ ते ३७ अंशावर तापमानाचा पारा होता. आता पुन्हा ३८ अंशाच्या घरात तापमान गेले आहे. उन्हाळ्यामुळे दिवसेंदिवस उन्हाचा पारा चढणार असल्याने दुपारी १२ ते ४ या वेळेत नागरिकांनी शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, असेही प्रशासनाच्या आपत्ती विभागाकडून सांगण्यात येत आहे.

भरपूर पाणी प्या आणि कडक उन्हापासून संरक्षण करण्याचीही गरज आहे. दरवर्षी सोलापुरात एप्रिल-मेच्या दरम्यान ४० ते ४४ अंशाच्या घरात तापमान जात असते. यामुळे अनेक नागरिक आता दुपारच्या वेळात छत्री बाहेर घेवून जाताना दिसतात. तर थंड पेयांच्या गाडीवर, दुकानात मोठी गर्दी दिसते. पाणी थंड ठेवणाऱ्या गरिबांचे फ्रीज म्हणजेच माठांचीही विक्री या एक-दोन महिन्यात मोठ्या प्रमाणात होते. अवकाळी पाऊस, गारपिटीच्या तडाख्यानंतर आता हळूहळू उन वाढत आहे. मार्च महिन्यापासून उन्हाचा चटका तीव्र होऊ लागला आहे. उन्हाचा कडका वाढल्याने सोलापूरकर घामाघूम होऊ लागले आहेत. यंदाच्या उन्हाळ्यात प्रथमच कमाल तापमानाचा पारा मार्च महिन्यात ३९.४ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त झाला होता. आता अजून पुन्हा तापमानाचा पारा वाढू लागल्याने रस्त्यावर दुपारी एक ते तीन वाजेच्या सुमारास शुकशुकाट दिसून येतो आहे. अजून पुढील दोन महिने तापमानाचा चढता पारा राहणार आहे.

# जिल्ह्यातील ४४६ ग्रामपंचायती क्षयमुक्त

- जागतिक क्षयरोग दिनानिमित्त जिल्हाभर जनजागृती
- क्षयरुग्णांना दरमहा एक हजार रुपये आहार भत्ता
- जिल्हाभरात ५२४ रुग्ण घेताहेत उपचार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, २३ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील १०२७ ग्रामपंचायतींपैकी ४४६ ग्रामपंचायती क्षयमुक्त म्हणून पात्र ठरल्या आहेत. यामध्ये १७ सुवर्ण, ११४ रजत व ३१५ कांस्य श्रेणीतील ग्रामपंचायतींचा समावेश आहे. गतवर्षी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सोलापूर जिल्ह्याने महाराष्ट्रात ५ वा क्रमांक पटकावला होता, अशी माहिती जिल्हा आरोग्याधिकारी तथा जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी दिली.

टीबी अर्थात क्षयरोग हा संसर्गजन्य रोग असून त्यावर उपचार शक्य आहेत. यावरील सर्व तपासण्या व औषधोपचार शासकीय आरोग्य केंद्रांमध्ये मोफत स्वरुपात केले जातात. उपचार कालावधीत क्षयरुग्णांना दरमहा १००० आहार भत्ता डीबीटीमार्फत दिला जातो. जिल्हा क्षयरोग केंद्रासह पंढरपूर, बार्शी येथील उपकेंद्रात सिबिनॅट मशीन उपलब्ध आहे. २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त जिल्हाभरात व्यापक जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १०० दिवसांचे विशेष अभियान राबवून २९० अति जोखमीच्या गावांमध्ये संशयित रुग्णांची मोफत तपासणी केली जाणार आहे. निक्षय मित्र उपक्रमांतर्गत ७२० निक्षय मित्रांनी ९६२ रुग्णांना पोषण किट वितरित केले आहे. सध्या जिल्ह्यातील शासकीय व खासगी आरोग्य केंद्रांमध्ये ५२४ रुग्ण उपचार घेत आहेत, असेही त्यांनी सांगितले.





# 'धर्मांतर'प्रश्नी छत्तीसगडप्रमाणे महाराष्ट्रातही जन्मठेप झाली पाहिजे

- आमदार टी.राजासिंग यांचे प्रतिपादन
- श्रीराम जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे विराट हिंदू संमेलन
- सरकारी जमिनींवर लावली जाताहेत अनधिकृत झेंडे

**सोलापूर, दि.२३ मार्च-**

'धर्मांतर'बाबत महाराष्ट्रातील महायुती सरकारने केलेल्या कायद्याचे स्वागत करतो. केवळ कायदा करुन चालणार नाही तर त्याची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. छत्तीसगडमध्ये धर्मांतर करणाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा दिली जाते. तसाच कठोर पवित्रा महाराष्ट्रातही घ्यावा, असे रोखठोक प्रतिपादन तेलंगणाचे आमदार टी.राजासिंग यांनी केले.

श्रीराम जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने आयोजित प्रभू श्रीरामांचे ५१ मूर्ती वाटप व हिंदू विराट संमेलनात बोलताना ते पुढे म्हणाले, सरकारी जमिनींवर अनधिकृतपणे 'झेंडे' लावले जात असून हा 'लॅन्ड जिहाद'चा प्रकार आहे. महाराष्ट्रात औरंगजेबाची कबर आम्हाला मान्य नाही. 'छावा' चित्रपट आल्यानंतर संपूर्ण भारतातील हिंदूंची हीच मागणी आहे की, ती कबर उखडून फेकावी.

आमदार गोपीचंद पडळकर याप्रसंगी बोलताना म्हणाले, हिंदू समाजाच्या एकतेचा, संस्कृती जतनाचा आणि धर्माभिमानाचा प्रभावी संदेश पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. समस्त हिंदू आघाडीचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद एकबोटे म्हणाले, हिंदूने त्यांच्याकडून रामजन्मभूमी हिसकावून घेतली. याचे श्रेय राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपा आणि विश्व हिंदू परिषदेला जाते. व्यासपीठावर महापौर विनायक कोंड्याल, श्रीराम जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष सुधीर बहिरवाडे आदींची उपस्थिती होती. श्रीराम जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे उत्सव अध्यक्ष डॉ.सूर्यप्रकाश कोठे यांनी प्रास्ताविक केले. मंगेश लामकाने व राधिका जाधव यांनी सूत्रसंचालन केले. दरम्यान, प्रभू श्रीराम, सीतामाता, लक्ष्मण व हनुमान यांच्या वेशभुषा केलेल्या बालकलाकारांचे बग्गीतून कार्यक्रमस्थळी आगमन होताच मान्यवरांच्या हस्ते त्यांचे स्वागत करण्यात आले. प्रारंभी शिवकालीन मर्दानी खेळांचे सादरीकरण करण्यात आले. या संमेलनाच्या अनुषंगाने चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३९१

**न करितां परनिंदा परद्रव्य अभिलाषा**
**काय तुमचें वेंचे सांगा**

माणसाला प्रत्येक घटनेतून आनंद हवा असतो. आनंद मिळविण्यासाठी माणूस वाट्टेल ते करतो. कसल्याही प्रकारचे कष्ट न करताही आनंद मिळविण्याचे मार्ग मानवाकडे आहेत. या मार्गांपैकी एक प्रमुख मार्ग म्हणजे दुसऱ्याची निंदा करणे. निंदा करण्यासाठी धन खर्च करावे लागत नाही. दुसऱ्याला कमी लेखणे, त्याच्या दोषाची, उणीवाची उजळणी करणे, अकारण डवचविणे, चिडवणे, नांव ठेवणे असे अघोरी प्रकार करुन माणूस आनंद मिळवतो. समोरच्याला जेवढी चिड येईल, जेवढे दु:ख वाटेल तेवढा जास्त आनंद निंदा करणाऱ्याला मिळत असतो. दुसऱ्याच्या दु:खात सुख मानण्याची ही प्रवृत्ती घातक असतांनाही बुध्दीजीवी माणसाला आनंद वाटतो हे विशेष. काहींना तर इतरांना नांव ठेवल्याशिवाय चैनच पडत नाही. घरची काम-धंदे सोडून एखाद्या सार्वजनिक ठिकाणी बसून येणाऱ्या-जाणाऱ्यांची किंवा शेजाऱ्यांची टिंगल-टवाळी करीत बसणारी अनेक टोळकी आपणाला पहायला मिळतात. एखाद्याच्या समोर निंदा करण्यापेक्षाही त्याच्या अनुपस्थितीत निंदा करण्यात जास्त आनंद मानला जातो. आपल्या निंदा करण्यामुळे समोरच्याला किती मानसिक त्रास होत असेल याचा विचार केला जात नाही. बऱ्याचवेळा ही निंदा, टिंगल-टवाळी समोरच्यासाठी जीवघेणी ठरते. अशा अनेक आत्महत्येच्या घटना घडतात की, ज्या केवळ निंदा, टिंगल-टवाळी सहन न झाल्यामुळे होतात. निंदा हा समाजाला लागलेला एक महाभयंकर रोग आहे. दुसऱ्याची निंदा करण्यात आनंद मानण्याप्रमाणे दुसऱ्याचे द्रव्य हिसकावून घेण्यात किंवा फसवून दुसऱ्याचे द्रव्य काढण्यातही आनंद मानणारे आहेत. परद्रव्याची अपेक्षा ही कधीही पूर्ण होणारी नाही. जेवढे द्रव्य मिळविले त्यात समाधान न मानता माणूस आणखी मिळतच जावे म्हणून प्रयन्तशील राहतो. त्याचा हा चुकीचा प्रयन्त त्याच्याकडे असलेल्या धनाचा त्याला योग्य प्रकारे उपभोग घेऊ देत नाही. हव्यास वाईटच असतो. क्लेषकारक व दु:खकारक असणारी ही परनिंदा न करण्यासाठी व परद्रव्याचा हव्यास न करण्यासाठी कांही खर्च करण्याची गरज नाही. केवळ आपली मानसिकता बदलली म्हणजे या दोन्ही नकारात्मक गोष्टी नष्ट होऊ शकतात. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, '**करितां परनिंदा परद्रव्य अभिलाष काय तुमचें वेंचे सांगा**'



परनिंदा व परद्रव्याचा त्याग करण्यासाठी आपले काय खर्च होणार आहे? असा प्रश्न महाराजांनी केला आहे. या प्रश्नातून त्यांनी उत्तरही दिले आहे. आपले कांहीच खर्च होत नसतांनाही लोक असा वेडेपणा का करतात? असा प्रश्न आपल्या मनात येऊ शकतो. या प्रश्न निर्मितीस आपली मानसिकताच कारणीभूत आहे. आपण परनिंदा, परद्रव्याच्या मार्गावर जायचे नाही, असे ठरविले म्हणजे झाले. परनिंदा व परद्रव्य प्रारंभी सुखावह वाटले तरी ते खऱ्या अर्थाने दु:खकारकच आहेत. दुसऱ्याला कमी लेखण्यामुळे आपण मोठे होत नसतो. दुसऱ्याचे लुबाडलेले धन सुख देणारे नसते. दुसऱ्याच्या कष्टाच्या फळाची लुबाडणूक करणे, नांव ठेवणे हा तामसीपणा आहे. तामसीपणा कोणासाठीही सुखावह नसतो. जय राम कृष्ण हरी।

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार,**
**दि. २४ मार्च २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - रौद्र**
**मास - फाल्गुन शु. षष्ठी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- रोहिणी (१९.०४)**
**योग - आयुष्यमान (३०.०१)**
**करण - गरज (२६.५७)**
**राहू काल : मंगळवार**
**स. ३.०० ते ४.३०**

**दिनविशेष : * जागतिक क्षयरोग दिन**
**१९४६: भारताला स्वातंत्र्य देण्यासाठी 'कॅबिनेट मिशन' दिल्लीत दाखल झाले**
**१९७७: स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रथमच केंद्रात गैर-काँग्रेस सरकार स्थापन झाले आणि मोरारजी देसाई यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली.**
**१९९८: टायटॅनिक चित्रपटाला विक्रमी ११ ऑस्कर पुरस्कार.**
**१६०३: इंग्लंडची राणी एलिझाबेथ प्रथम यांचे निधन.**

### कॉपीमुक्त नवे धोरण जाहीर

# आता शहरी भागातच अधिक परीक्षा केंद्रे : शिक्षण मंडळाने घेतला मोठा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**
कॉपीमुक्त परीक्षा राबविण्यासाठी म हाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मोठा निर्णय घेतला असून, ग्रामीण भागातील अनेक परीक्षा केंद्रे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. आवश्यक सुविधा आणि किमान ५०० विद्यार्थ्यांची बैठक क्षमता असलेल्या केंद्रांनाच यापुढे मान्यता देण्यात येणार असून, शहरी भागातील केंद्रांची संख्या वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.

यंदाच्या दहावी व बारावी परीक्षांदरम्यान सीसीटीव्ही, बैठे पथके आणि भरारी पथके असूनही ३०० हून अधिक कॉपीचे गैरप्रकार समोर आले. विशेषतः ग्रामीण भागातील केंद्रांवर हे प्रकार अधिक प्रमाणात आढळले. त्यामुळेच आता परीक्षा केंद्रांच्या रचनेत आमूलाग्र बदल करण्याचा निर्णय बोर्डाने घेतला आहे.

यापूर्वी जिल्हास्तरावर अधिकाऱ्यांकडून केंद्रांची पाहणी करून अहवाल सादर करण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात अनेक केंद्रांवर आवश्यक सुविधा नसल्याचे स्पष्ट झाले. या पार्श्वभूम ीवर आता बोर्डाचे अधिकारीच राज्यातील सर्व परीक्षा केंद्रांची थेट पडताळणी करणार आहेत. सीसीटीव्ही व्यवस्था, सुरक्षित वॉल कंपाऊंड, पिण्याच्या पाण्याची सोय आणि बैठक क्षमता या निकषांवर केंद्रांची तपासणी केली जाईल. अपुऱ्या सुविधा असलेल्या केंद्रांची मान्यता रद्द केली जाणार आहे.

राज्यात पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण असे एकूण नऊ विभाग आहेत. बारावी परीक्षेत कोकण वगळता इतर आठ विभागांत कॉपीचे प्रकार मोठ्या प्रमाणात आढळले, तर दहावी परीक्षेतही अनेक केंद्रांवर गैरप्रकार उघडकीस आले. शहरी भागात परीक्षा केंद्रे असल्यास पोलिस बंदोबस्त तत्काळ उपलब्ध होतो आणि भरारी पथकांना नियमित तपासणी करणे सुलभ होते. त्यामुळेच कॉपीमुक्त परीक्षेसाठी शहरी भागातील केंद्रांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सध्या ग्रामीण भागात सुमारे ४० टक्के तर शहरी भागात ६० टक्के परीक्षा केंद्रे आहेत.

मात्र, आगामी काळात शहरी केंद्रांचे प्रमाण आणखी वाढविण्यात येणार आहे. तसेच, सध्या २५० विद्यार्थ्यांची क्षमता असलेल्या केंद्रांच्या तुलनेत आता किमान ५०० विद्यार्थ्यांची क्षमता असलेली केंद्रेच निश्चित केली जाणार आहेत.यासंदर्भात बोर्डाचे अध्यक्ष, विभागीय अध्यक्ष आणि संबंधित अधिकाऱ्यांची पुढील आठवड्यात बैठक होणार असून, त्यानंतर नव्या धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

एकंदर कॉपीमुक्त परीक्षा सुनिश्चित करण्यासाठी बोर्डाने घेतलेला हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असून, सुविधायुक्त केंद्रे, कडक नियंत्रण आणि पारदर्शक प्रक्रिया यामुळे परीक्षा व्यवस्थेवर अधिक विश्वास निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात

**परीक्षा गैरप्रकारांची आकडेवारी :**
इयत्ता दहावी : ७४ केंद्रांवर गैरप्रकार
इयत्ता बारावी : २३७ प्रकरणे
एकूण कॉपी केस : ३१८
सामूहिक गैरप्रकार : ७

**नवे नियम**
किमान ५०० विद्यार्थ्यांची क्षमता आवश्यक
ग्रामीण भागातील अनेक केंद्रे बंद
शहरी भागात केंद्रांची संख्या वाढणार
बोर्डाकडून प्रत्येक केंद्राची थेट पडताळणी
सुविधा नसलेल्या केंद्रांची मान्यता रद्द



# 'लुई ब्रेल बहुउद्देशीय सामाजिक संस्थे'तर्फे स्त्री शक्तीचा जागर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**
जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लुई ब्रेल बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात महाराष्ट्रातून १००हून अधिक महिला पदाधिकारी आणि सदस्यांनी उपस्थित राहून स्त्री शक्तीचा जागर केला.

महिलांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी या कार्यक्रमात गायन, काव्यवाचन आणि उखाणे स्पर्धांचे आयोजन केले होते. आपल्या मधुर आवाजात गाणी सादर करत आणि उखाण्यांच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवत महिलांनी हा सोहळा अविस्मरणीय केला. बाहेरगावाहून आलेल्या महिलांच्या निवासाची आणि भोजनाची व्यवस्था संस्थेने केली होती.

याप्रसंगी राज्याच्या महिला उपाध्यक्ष रीना पाटील, राज्य सचिव संतोषी भाभी, कार्यकारिणी सदस्य लता गायकवाड, अंजली शेळके, नाशिकच्या महिला उपाध्यक्ष अलका माठाले, अहमदनगरच्या मंगल भागवत, पुण्याच्या कार्यकारिणी सदस्य सीमा पोकले आणि कोल्हापूरचे बसीर शेख, उद्योजक शांताबाई पुरापाटी, व्हाईस कॅप्टन गंगा कदम, डॉ. मंजुषा शहा यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. प्रास्ताविक संतोष देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन आशा पाटील यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष सुरज सोनटक्के यांनी आभार मानले.

# सुखाचा होणार संसार; नवदांपत्यांना मिळाले ४६.५० लाखांचे अनुदान

### समाजकल्याण विभागाच्या आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजनेचे पहिल्या टप्प्याचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**
आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनाच्या वतीने जिल्हा परिषद समाज कल्याण विभागामार्फत सदरची योजना राबवली जात आहे. त्याअनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातून चालू आर्थिक वर्षात म्हणजेच सन २०२५-२६ यावर्षामध्ये सुमारे १५० नववाहित लाभार्थी दांपत्याचे अर्ज कार्यालयाकडे दाखल झाले होते. त्यापैकी ९३ हजार लाभार्थी नवविवाहित दांपत्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये याप्रमाणे ४६ लाख ५० हजार इतके अनुदान पी.एफ.एम.एस. या प्रणालीद्वारे थेट लाभार्थी दाम्पत्याच्या खात्यावर वर्ग करण्यात आली आहे.

दरम्यान, उर्वरित ५७ लाभार्थीपैकी



४४ लाभार्थ्यांचे प्रलंबित देय १२ लाखांचा निधीची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. तर १३ लाभार्थ्यांचे अर्ज निकषात त्रुटी आढळल्याने नामंजूर करण्यात आले आहेत.

जे नविवाहित लाभार्थी दांपत्य योजनेसाठी पात्र आहेत. त्यांच्या बँक खात्यावर मार्च अखेर पी.एफ.एम.एस. प्रणालीद्वारे अनुदानाची रक्कम वर्ग करण्यात येईल अशी माहिती समाज कल्याण विभागाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित ४४ आंतरजातीय विवाह केलेल्या लाभार्थी नवदांपत्यांना अद्याप अनुदानाची प्रतीक्षा लागलेली आहे.

**अनुदान वाढवण्याची होते मागणी**
आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजनेचे मूल्य वाढवण्याची मागणी लाभार्थ्यांमधून केली जात आहे. पाच वर्षांपूर्वी यायोजनेतून लाभार्थ्यांना केवळ १५ हजार इतके अनुदान प्राप्त होत असे. त्यामध्ये वाढ करण्यात आली खरी परंतु, केंद्र सरकारच्या धरतीवर हे अनुदान अडीच लाख प्रत्येकी लाभार्थी अशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

**अनुदानासाठी या कागदपत्रांची पूर्तता करणे असते आवश्यक.**
आंतरजातीय विवाह अर्थसाह्य योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान मिळण्यासाठी लग्नाचे प्रमाणपत्र, दांपत्यांचे आधार कार्ड, दांपत्यांचे शाळा सोडल्याचा दाखला, प्रतिज्ञापत्र, जातप्रमाणपत्र, लग्नाचे फोटो, रहिवासी दाखला, लग्न खर्च तपशील, बँक खात्याचे जॉईंट अकाउंट, एन.एफ.टी फॉर्म याकागदपत्रांची पूर्तता अर्ज सादर करावयाच्यावेळी करावी लागते.

**नविवाहित दांपत्यांना लाभ प्राप्त**
जातीं जातींमधील अंतर व दुरावा कमी व्हावा, समाजामध्ये आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने जिल्हा परिषद समाज कल्याण विभागामार्फत आंतरजातीय विवाह योजनेअंतर्गत आंतरजातीय लग्न केलेल्या नवविवाहित दांपत्यांना ५० हजार इतके अनुदान दिले जात आहे. हे अर्थसहाय्य मिळवण्यासाठी शासन स्तरावरून आर्थिक वर्षात ठराविक निधींची तरतूद केली जाते. जिल्ह्यातील १५० नवविवाहित दांपत्यापैकी ९३ नवविवाहित दांपत्यांना याचा लाभ प्राप्त झाला आहे. उर्वरित नवविवाहित दांपत्यांना लवकर अनुदान प्राप्त होईल. जे अर्ज निकषात बसत नाहीत असे १३ अर्ज नामंजूर करण्यात आले आहे.
**–प्रसाद मिरकले,**
प्रभारी समाज कल्याण अधिकारी

# रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त बालाजी अमाईन्सकडून साहित्य वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**
रस्ता सुरक्षा सप्ताह २०२६ निमित्त बालाजी अमाईन्स लि., यांच्या वतीने महामार्ग पोलीस मदत केंन्द्र पाकणी येथे विविध सुरक्षा साहित्याचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत हेल्मेट, रिफ्लेक्टर जॅकेट, प्रथमोचार पेटी या साहित्याचे वितरण करण्यात आले. महामार्गावर प्रवास करणा-या दुचाकी स्वारांच्या सुरक्षेसाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यकमाचे आयोजन रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आले होते.



या वेळी कंपनीचे जनरल मॅनेजर गोविंद मेंचेकरे यांच्या हस्ते पाकणी महामार्ग पोलिस मदत केंन्द्राचे प्रभारी अधिकारी आनंद थिटे यांच्याकडे हेल्मेट रिफलेक्टर जॅकेट, प्रथमोपचार पेटी सुपूर्त करण्यात आले.

या कार्यक्रमास बालाजी अम ाईन्सचे सीएसआर प्रमुख अनिल विपत, दत्तप्रसाद सांजेकर, आदित्य जैन, अमोल गुंड, बसवराज आंटद हे उपस्थित होते.

यामुळे आनंद थिटे यांनी बालाजी अमाईन्स लि., कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डी राम रेड्डी व इतर संचालक मंडळाचे आभार मानले.

# जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केली जिल्हा कोषागार कार्यालयाची पाहणी

### मार्च अखेरच्या पार्श्वभूमीवर आर्थिक कामकाजाचा घेतला आढावा

### तातडीने देयके निकाली काढण्याच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**
आर्थिक वर्षाचा शेवटचा महिना असल्याने शासकीय कामांची लगबग वाढली आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज जिल्हा कोषागार कार्यालयाला सदिच्छा भेट देऊन कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी केली. मार्च अखेरमुळे तिजोरीवर असलेला कामाचा ताण आणि प्रलंबित देयकांची स्थिती जाणून घेवून देयके तातडीने निकाली काढण्याच्या सुचना केल्या.



या भेटीदरम्यान जिल्हा कोषागार अधीक्षक वैभव राऊतयांनीजिल्हाधिकाऱ्यांचे स्वागत केले. मार्च म हिना हा आर्थिक वर्षाचा अखेरचा टप्पा असल्याने विभागामार्फत करण्यात आलेल्या नियोजनाची सविस्तर माहिती त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिली. विविध विभागांकडून प्राप्त होणारी देयके आणि त्यांच्या वितरणाची सद्यस्थिती याबाबत सादरीकरण करण्यात आले. मार्चअखेर प्रणालीवर येणारा ताण लक्षात घेता, कोणतीही तांत्रिक अडचण येऊ नये यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती देण्यात आली. शेवटच्या दिवसांत होणारी गर्दी टाळण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या कामाचे नियोजन आणि वाढीव वेळेत सुरू असलेले कामकाज यावर चर्चा झाली.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कोषागार कार्यालयातील विविध विभागांना भेटी देऊन कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. कोणतीही देयके तांत्रिक कारणास्तव प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी. निधीचे वितरण करताना नियमांचे काटेकोर पालन करून पारदर्शकता राखावी. इतर सर्व शासकीय विभागांशी समन्वय ठेवून वेळेत देयके सादर करण्याबाबत सूचना द्याव्यात. यावेळी जिल्हा कोषागार कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मार्चअखेरचे सर्व आर्थिक व्यवहार विहित मुदतीत पूर्ण होतील, असा विश्वास जिल्हा कोषागार अधीक्षक वैभव राऊत यांनी यावेळी व्यक्त केला.

# १ एप्रिलपासून राज्यभर आरोग्य चळवळ; ८०.७५ कोटींच्या योजनेला मंजुरी

### लोकसहभागातून उभी राहणारी व्यापक आरोग्य चळवळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**
राज्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम, स्वयंपूर्ण आणि रोगमुक्त करण्याच्या दृष्टीने माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून साकारलेली ही योजना लोकसहभागावर आधारित राज्यव्यापी आरोग्य चळवळ ठरणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संतोष नवले यांनी दिली आहे.

१ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत संपूर्ण राज्यात हे अभियान राबविण्यात येणार असून, गावपातळीवर नागरिकांचे आरोग्यमान उंचावणे हा यामागील प्रमुख उद्देश आहे. या अभियानाच्या माध्यमातून प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्य सेवांना चालना, आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत सकारात्मक बदल आणि आरोग्यदायी जीवनशैली रुजविण्यावर भर देण्यात येणार आहे. सार्वजनिक स्वच्छता, सुरक्षित पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, तसेच सामाजिक प्रबोधन यांचा समन्वय साधत आरोग्यदायी गाव घडविण्याचा प्रयत्न होणार आहे. योजनेत संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे नियंत्रण, माता-बाल आरोग्य सुधारणा, पोषण, मानसिक आरोग्य आणि जलजन्य आजारांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. उपचारापेक्षा प्रतिबंध या तत्त्वावर आधारित ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

**स्थानिक पातळीवरील अंमलबजावणी**
सोलापूर जिल्ह्यात ही योजना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे. यासंदर्भात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठका घेऊन सर्व तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

**लोकसहभागातून उभी राहणारी व्यापक आरोग्य चळवळ**
माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव ही योजना केवळ शासकीय उपक्रम नसून, लोकसहभागातून उभी राहणारी व्यापक आरोग्य चळवळ ठरणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा मिळणार असून, आरोग्यदायी महाराष्ट्राच्या संकल्पनेला अधिक बळकटी मिळणार आहे.
**डॉ. संतोष नवले**, जिल्हा आरोग्य अधिकारी



**अंमलबजावणीची रचना**
योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्या स्थापन केल्या जाणार असून राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष आरोग्यमंत्री असतील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी सदस्य म्हणून कार्यरत राहतील गावांचे मूल्यमापन करून ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून घोषित करण्यात येणार आहे. अशा गावांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल.या महत्त्वपूर्ण अभियानासाठी सुमारे ८०.७५ कोटी रुपयांच्या निधीस मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

## बांधकामावरील विटेने मारहाण

**सोलापूर :** बांधकामावरील विटेने मारहाण करण्याची घटना घडली आहे. याबाबातची हकीकत अशी, विशाल कोळी (वय २२, रा. शेळगी) हे बनशंकरी मंदिराजवळ बाजूच्या मैदानाकडे आले असता आरोपी अनिल, विश्वनाथ व सागर शिरसीकर आणि शिवनाथ पाटील (सर्व रा. शेळगी) यांनी विशाल यांना सारखे मला फोन कशाला करतो, तेव्हा विशाल यांनी माझे पैसे दे असे म्हणाले असता सर्व आरोपींनी व शिवण्णा कोळीस शिवीगाळ करत लाथा बुक्क्याने मारण्यास केली. त्यावेळी तेथे बाजूला बांधकाम चालू असलेल्या जागेवरून अनिल शीर्षीकर यांनी वीट घेऊन विशाल कोळी यास डोक्यात मारून जखमी केले. याबाबत जोडबावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास वाघमारे करत आहेत.

# ऑर्गेनिक फार्मर कपचे आयोजन; महिलांना सेंद्रीय शेतीकडे वळविण्याचा संकल्प

### ड्रीम फाऊंडेशनचा अभिनव उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**
जागतिक महिला शेतकरी वर्ष २०२६ निमित्त ड्रीम फाऊंडेशनतर्फे महिलांसाठी एक अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात येत आहे.

'ड्रीम ऑर्गेनिक फार्मर कप २०२६' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, १० गुंठे जमिनीत सेंद्रीय शेतीतून सर्वाधिक उत्पादन घेणाऱ्या महिलेला तब्बल २१ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक देण्यात येणार आहे, अशी माहिती संयोजक काशीनाथ भतगुणकी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बसव संगम शेतकरी गट आणि राजमाता जिजाऊ महिला शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा आयोजित केली आहे. या उपक्रमाला बीज माता पद्मश्री राहीबाई पोपरे यांच्या कार्याची प्रेरणा लाभली आहे. विषमुक्त अन्न व भाजीपाला उत्पादनाला चालना देण्यासाठी महिलांनी सेंद्रीय शेतीकडे वळावे, हा या स्पर्धे चा मुख्य उद्देश आहे. स्पर्धा ५ जून ते ५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत होणार असून सहभागी महिलांना ड्रीम फाऊंडेशनतर्फे बियाणे, सेंद्रीय खत आणि भाजीपाला उत्पादनाचे प्रशिक्षण मोफत दिले जाणार आहे. स्पर्धेअंतर्गत १० गुंठे जमिनीत दोन प्रकारच्या पालेभाज्या आणि तीन प्रकारच्या फळभाज्यांची लागवड करणे आवश्यक राहणार आहे.

या स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिकासह सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार असून, एकूण २१ स्पर्धकांना विशेष बक्षिसे दिली जाणार आहेत. विशेष म्हणजे, महिलांनी उत्पादित केलेल्या सेंद्रीय भाजीपाल्याची खरेदी ड्रीम ॲग्रीमार्टमार्फत हमीभावात केली जाणार असून, त्याची थेट विक्री ग्राहकांपर्यंत पोहोचवली जाणार आहे.

स्पर्धेसाठी इच्छुक महिलांनी २६ मार्च ते ११ एप्रिल २०२६ दरम्यान नावनोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच सहभागी महिलांसाठी १ मे ते ३ मे दरम्यान सोरेगाव येथील सिद्धेश्वर रिसॉर्ट येथे निवासी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले असून राज्यातील कृषी तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.कृषी विभाग, सोलापूर, बालाजी फाऊंडेशन, अभिनव फार्मस् क्लब (पुणे), सिंचन सहयोग आदी संस्थांचे सहकार्य या उपक्रमाला लाभत आहे. या उपक्रमात जास्तीत जास्त महिला व महिला शेतकरी गटांनी सहभागी व्हावे, असे आवाहन गजराबाई भतगुणकी यांनी केले आहे.

**निसर्ग व माती वाचविण्याची गरज : पद्मश्री राहीबाई पोपरे**
सध्या रासायनिक फवारणी व खतांमुळे सर्वजण पिकाच्या माध्यम ातून विष खात आहेत. यामुळे अनेक आजार होत आहेत. गावरान बेण्याचा वापर करून सेंद्रिय शेती करण्याची गरज निर्माण झाली आहे. यासाठी मी रोज एका गावात जाऊन निसर्ग व माती वाचविण्याचा संदेश देत आहे. सेंद्रिय शेती ही काळाची गरज आहे, असे आवाहन पद्मश्री राहीबाई पोपरे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सीएनजी, एलपीजी तुटवड्यामुळे भाविकांची संख्या रोडावली

## धार्मिक पर्यटन घटले; हॉटेल लॉजिंग प्रासादिक वस्तु उलाढालीवर प्रचंड परिणाम

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट. दि २४ मार्च-**

अमेरिका इस्त्राईल इराण युद्धामुळे एलपीजी सीएनजी गॅस पुरवठ्यावर मोठा परिणाम जाणवला. यामुळे तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीतील महत्वाचा दत्त अवतार श्री स्वामी महारज प्रकटदिन उत्सव यावर मोठा परिणाम झाल्याचे दिसून आले. सीनजी गॅस मुळे अल्प दरात प्रवास होतो. एलपीजी गॅस तुटवड्यामुळे हॉटेल व्यवसायावर मोठा परिणाम झाला . परिणामी प्रकट दिन उत्सवास भाविकांची संखा प्रचंड प्रमाणात रोडावल्याचे दिसुन आले. परिणामी उत्सवामुळे अनेक व्यवसायाची होणारी मोठी उलाढाल यंदा ठप्प झाली.

तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी येणाऱ्या परगावच्या भाविक भक्तांमुळे अक्कलकोट शहर व परिसरात विविध भागात विविध व्यवसायांना चालना मिळाली आहे टो रिक्षा जीप लॉजीग हॉटेल धार्मिक पुस्तके ग्रंथ प्रासादिक वस्तु पेढे नारळ चुरमुरे बत्ताशे पुष्प हार कंठीमाळा देवदेवतांची प्रतिमा मुर्ती पदक अंगठी कंठी माळ रुद्राक्ष खेळणी. आदिची उत्सव काळात १ सलग सुट्टी काळात प्रचंड व्यवसाय होतो मात्र यंदा स्वामी महाराजाचा प्रकट दिन उत्सव निमित्याने भाविकांची संख्या प्रचंड रोडावल्याचे प्रकर्षाने जाणवले. सी एन जी एलपीजी तुटवडा मुळे पर्यटक यात्री स्वामी भक्त प्रकट दिन उत्सवाकडे पाठ फिरवल्याचे निदर्शनास आले. यामुळे उत्सव काळात हॉटेल लॉजीग ट्रॅव्हल्स प्रासादिक वस्तु आदि मध्ये होणारी प्रचंड उलाढालीवर मोठा परिणाम झाल्याचे विविध व्यवसायिकांनी सांगितले .

### धार्मिक पर्यटनामुळे अक्कलकोट परिसरात अनेकांचा चालतो चरितार्थ




धार्मिक पर्यटनामुळे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत, अक्कलकोट शहर व परिसरात धार्मिक पर्यटनामुळे लाखो रुपयांची उलाढाल होत असते तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीमध्ये अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक भक्त येतात. सलग शासकीय सुट्ट्या शनिवारी रमजान ईद सुट्टी होती रविवारी सुट्टीचा दिवस होता. व शुक्रवारी दत्त अवतार श्री स्वामी महाराज प्रकट दिन उत्सव होता . प्रकट दिन उत्सव व सलग आलेली सुट्टी यामुळे भाविका ना पर्वणी असुनही यंदा प्रकट दिन उत्सवास पर्यटक स्वामी भक्त यांची संख्या प्रचंड प्रमाणात रोडावल्याचे जाणवले.

एलपीजी गॅस तुटवडा मुळे हॉटेल व्यवसावावर झालेला प्रचंड परिणाम प्रवाशी पर्यटक यांची होणारी गैरसोय मुळे यंदा उत्सवास भाविकांची संख्या प्रचंड प्रमाणात घटली. सीएनजी गॅस तुटवडा मुळे अनेकांकडे स्वतःचे वाहन असुनही प्रवास करणे टाळले. परिणामी अक्कलकोट तीर्थक्षेत्री प्रकट दिन उत्सवास भाविक कमी प्रमाणात उपस्थित असल्याचे दिसून आले.

परिणाम दररोज अक्कलकोट तीर्थक्षेत्री तुळजापुर गाणगापुर तीर्थक्षेत्री जाणारे हजारो भाविक अक्कलकोटी मुक्कामास येतात यामुळे हजारो रुपयांची उलाढाल हॉटेल आणि ढाब्यांवर होते. श्री स्वामी समर्थ मंदिर परिसरातील धार्मिक वस्तू विक्री करणारे तसेच प्रसाद विक्री करणारी दुकाने ही मोठ्या प्रमाणात आहेत. या दुकानांमध्ये यात्रा काळात गर्दीच्या वेळी लाखो रुपयांची उलाढाल होते यंदा यावर मोठा. परिणाम झाला.श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर तसेच श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळासमोरील परिसर परिसरात छोटे चहा विक्रेते नाष्टा टपऱ्या, भजी वडापाव विकणारे छोटे व्यवसायिक यांचेही व्यवसाय झाले नाही टो रिक्षानां सीएनजी गॅस तुटवड्यामुळे व पर्यटक भक्त यांच्या गर्दी अभावी रिक्षा चालकाच्या व्यवसायावर मोठा परिणाम दिसुन आला.

---

## महत्वाचे...



### चारे येथील पुलाच्या कामाचे भूमिपूजन

**बार्शी, दि. २३ मार्च-**

तालुक्याचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या प्रयत्नातून तालुक्यातील चारे ते काटेगाव मध्ये पुलाचे काम करण्यासाठी ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून त्या पुलाचे भूमिपूजन माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते करण्यात आले.गेली अनेक वर्षे हा पुल बांधण्यासाठी तेथील ग्रामस्थांची मागणी होत होती. याबाबत माजी आमदार राऊत यांच्याकडे तेथील ग्रामस्थांनी मागणी केली होती. त्यानुसार राज्य सरकारकडे माजी आमदार राऊत यांनी पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून पुलाचे काम मंजूर करण्यात आले आहे. या पुलामुळे अनेक गाव वाड्या जोडल्या जाणार असून नागरिकांना सोयीचे होणार आहे.यावेळी सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य, बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजय गरड, शिवाजी गायकवाड, डॉ. देवेंद्र डोके, पंचायत समिती सदस्य किरण घुले, शरद बसवंत, दिपक रोंगे, फुलचंद पालखे, अक्षय देसाई, डॉ. विलास लाडे तसेच चारे येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विवाहितेचा छळ; पतीसह सासरच्यांविरोधात गुन्हा

**बार्शी, दि. २३ मार्च-**

बार्शीत राहणाऱ्या एका विवाहित महिलेला पती व सासरच्या मंडळींकडून मानसिक शारीरिक छळ सहन करावा लागत असल्याची तक्रार समोर आली आहे. या प्रकरणी संबंधित महिलेने पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. प्राची अक्षय नागरगोजे (वय २४, रा. सध्या नाळे प्लॉट, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचा विवाह १६ जानेवारी २०२५ रोजी अकलुज येथे पारंपरिक पद्धतीने झाला होता. लग्नानंतर काही काळ संसार सुरळीत चालल्यानंतर पती अक्षय नागरगोजे यांचे दुसऱ्या महिलेबरोबर विवाहबाह्य संबंध असल्याचे तिला समजले. याबाबत जाब विचारल्यानंतर पतीने शिवीगाळ व मारहाण करण्यास सुरुवात केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. तसेच, तुझ्या माहेरुन पैसे घेऊन ये असा दबाव टाकत पती व सासरच्या मंडळींकडून वारंवार छळ करण्यात येत होता. या त्रासामुळे फिर्यादीच्या वडिलांनी वेळोवेळी रोख रक्कम व ऑनलाईन स्वरूपात पैसे दिल्याचेही नमूद करण्यात आले आहे. डिसेंबर २०२५ मध्ये पुन्हा वाद झाल्यानंतर पती, सासू, सासरे व दिर यांनी मिळून मारहाण काढल्याचा त्यानंतर काही दिवस माहेरी राहिल्यानंतर पतीने बोलावून घेतले, मात्र काही महिन्यांनी पुन्हा छळ सुरु झाला. अखेरीस माहेरुन पैसे आणल्याशिवाय घरात घेणार नाही असे सांगून तिला हाकलून दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### भगवंत नेत्रालयाने पार केला शंभर नेत्र शस्त्रक्रियांचा टप्पा

**बार्शी, दि. २३ मार्च-**

मातृभूमी प्रतिष्ठान बार्शी संचलित भगवंत नेत्रालय वा रुग्णालयाच्या शुभारंभ २ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आता. १९ जानेवारी रोजी या रुग्णालयामध्ये पहिले ऑपरेशन झाले आणि आता १५ मार्च रोजी यशस्वीरित्या शंभर क्षेत्र शस्त्रक्रियांचा टप्पा पार केला आहे.डॉ. अभिजीत आरसूळ व डॉ. श्वेतल सोमाली दांच्या मार्गदर्शनाखाली मोसिन पटेल, अभिषेक ताकभातें, राजश्री शेळके, सुजाता गायकवाड, रुपाली क्षीरसागर, अर्चना सोनवणे व सर्व टीमने रुग्णसेवा चालू केली. भगवंत नेत्रालयाच्या माध्यमातून परिसरातील माढा भूम परंडा तुळजापूर, कळंब या भागातून जवळपास २८०० रुग्णांनी रुग्णसेवेचा लाभ घेतला आहे.रुग्णालयात विनामूल्य व मोफत उपचार करण्यात येतात. वाळूज, सुरडी येथे बार्शी नगरपालिकेचे माध्यामातून शिबिराचे आयोजन देखील करण्यात आले आहे. आज १०० रुग्णांनी याचा लाभ घेतलेला आहे.लवकरच १००० चा टप्पा देखील पार करु असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष संतोष ठोंबरे यांनी यावेळी व्यक्त केला. नेत्र शस्त्रक्रिवेंचा शंभराचा टप्पा पार केल्याबद्दल रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. रुग्णालय विभागाचे अध्यक्ष प्रा. किरण गाढवे, संस्थेचे सचित प्रताप जगदाळे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.



### मंगळवेढ्याचे महसूल सहाय्यक शिवाजी भोसले यांना निलंबित करा

**मंगळवेढा, दि. २३ मार्च-**

मंगळवेढा तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक शिवाजी भोसले यांना निलंबित करा या मागणीसाठी शिवसेना उबाठा गटाचे मंगळवेढा युवक शहर अध्यक्ष अरविंद नाईकवाडी यांनी मंगळवेढा तहसील कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. रेकॉर्ड ऑफिसचे महसूल सहाय्यक भोसले हे जन्म व मृत्यु नोंद देण्यात दिरंगाई व टाळाटाळ करीत आहेत. नाईकवाडी यांना चार महिने हेलपाटे मारावे लागले. त्यामुळे त्यांचे मानसिक खच्चीकरण झाले व नाईकवाडी यांना राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. भोसले यांच्याविरुद्ध जनतेच्या अनेक तक्रारी आहेत, रेकॉर्ड ऑफिसचे फेरफार चलन ११ रुपये आहे. त्यापेक्षा ज्यास्त पैश्याची मागणी केली जाते. तसेच भोसले यांच्याकडे संजय गांधी प्रकरणातील २१ हजार रुपयेच्या दाखल्याच्या चौकशीचे प्रकरण आहे. त्या महिलांकडून पण चिरीमिरी घेतल्याशिवाय काम करत नाहीत, सर्कल चौकशीचा पण त्यांचा काही संबंध नसताना पैश्याची मागणी केली जाते. यावेळीआंदोलन स्थळी शिवसेना तालुका प्रमुख तुकाराम भोजने, शहर प्रमुख बापु खराडे,मनसे जिल्हा समन्वयक नारायण गोवे, राष्ट्रवादी युवक शहर अध्यक्ष देवदत्त पवार, उप तालुकाप्रमुख गंगाधर मसरे, उप तालुकाप्रमुख अरुण मोरे, विभाग प्रमुख बाळू सरळले, विभाग प्रमुख सचिन गावकरे, विभाग प्रमुख नरळे मेजर, शाखाप्रमुख रेवन बिराजदार, लक्ष्मण निकम, श्रीकांत माने, मोहन काकडे आदी उपस्तित होते.

---

## बार्शीच्या अश्विनी भोसले-ठाकरे यांना राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षिका' पुरस्कार जाहीर

### कोरफळे येथील श्री येमाई देवी विद्या मंदिराचा बहुमान; २९ मार्च रोजी पुण्यात होणार गौरव सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२३ मार्च-**


शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने झटणाऱ्या बार्शी तालुक्यातील कोरफळे येथील श्री येमाई देवी विद्या मंदिराच्या शिक्षिका अश्विनी राजाभाऊ भोसले (ठाकरे) यांना सन २०२५-२६ चा प्रतिष्ठित 'ध्येय एज्युकेशन फाउंडेशन' संचलित राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षिका पुरस्कार' जाहीर झाला आहे. ध्येय एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. सुदाम शेंडगे सर यांनी अश्विनी भोसले यांना अधिकृत नामांकन पत्र पाठवून त्यांचे अभिनंदन केले आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार, २९ मार्च २०२६ रोजी ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, निगडी (पिंपरी चिंचवड महानगरपालिका), पुणे येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. ध्येय एज्युकेशन फाउंडेशन ही संस्था महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची भीती घालवून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'मैलाचा दगड' ठरत आहे. अशा प्रतिष्ठित संस्थेकडून गौरव होणे ही अभिमानाची बाब आहे.शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदान आणि विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अश्विनी भोसले यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. अश्विनी भोसले यांना २०२३-२४ मध्ये सोलापूर जिल्हा 'एकता महिला मंच'च्या वतीने देखील राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. सातत्याने दोन वर्षांत दोन मोठे राज्यस्तरीय पुरस्कार मिळवून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे.

---

## कवठेकर प्रशालेच्या शिक्षकांना लाभले 'डिजिटल कवच'

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ मार्च -**

बदलत्या काळाची गरज ओळखून आणि शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याच्या उद्देशाने, पंढरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित कवठेकर प्रशाला (नाथ चौक) येथील शिक्षकांना संस्थेचे सचिव सुधीर पटवर्धन यांच्या हस्ते शैक्षणिक कार्यासाठी लॅपटॉपचे वितरण गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर करण्यात आले.



या उपक्रमामुळे प्रशालेतील शैक्षणिक कामकाज आता अधिक हायटेक आणि गतिमान होणार आहे. या शिक्षकांना तंत्रज्ञानाची जोड, गुणवत्तेची ओढ मिळणार असून सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे आहे. अध्यापन प्रक्रिया केवळ पुस्तकांपुरती मर्यादित न राहता ती दृकश्राव्य (विळे-तळींरिश्र) स्वरूपात विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शिक्षकांकडे आधुनिक साधने असणे अनिवार्य झाले आहे. हीच बाब लक्षात घेऊन संस्थेने आपल्या शिक्षकांना लॅपटॉप उपलब्ध करून देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला.

यावेळी प्रमुख अभ्यागत म्हणून मार्गदर्शन करताना संस्थेचे सचिव श्री. पटवर्धन यांनी सांगितले की विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षकांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. लॅपटॉपच्या माध्यमातून शिक्षक विद्यार्थ्यांना अधिकाधिक चांगल्या प्रकारे ई-कंटेंट तयार करून देऊ शकतील आणि अध्यापन प्रक्रिया अधिक रंजक बनवतील. संस्थेचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे की, शिक्षकांना उत्तम सोयीसुविधा देऊन शैक्षणिक दर्जा उंचावला जावा.

या वितरण सोहळ्यामुळे शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. प्रशालेतील शिक्षकांनी या उपक्रमाचे मनः पूर्वक स्वागत केले असून, यामुळे प्रशासकीय कामकाज, गुणपत्रिका तयार करणे आणि ऑनलाईन शैक्षणिक संसाधनांचा वापर करणे अधिक सुलभ होईल व शिक्षकांमध्ये ई लर्निंग बद्दलचा आत्मविश्वास अधिकाधिक बळावेल , असा विश्वास व्यक्त केला. आपल्या भाषणात पुढे बोलताना श्री.पटवर्धन यांनी पुणे रोटरीचे असिस्टंट गव्हर्नर धनंजय राजूरकर, रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीचे सागर ताजने व कवठेकर प्रशालेचे चंद्रशेखर राजूरकर यांच्या अथक प्रयत्नांमुळे लॉरेन्स अँड पॅरिस या कंपनीने सीएसआर (उड्ठ) फंडातून या संस्थेला एचपी (क्ष) कंपनीचे ४५ लॅपटॉप प्रदान केल्याचे आवर्जून नमूद केले.

या वेळेस संस्था सदस्य एस.पी. कुलकर्णी हेही यावेळी आवर्जून उपस्थित होते.कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.वाय पाटील यांना प्रतिकात्मकरीत्या प्रथम लॅपटॉप प्रदान करून या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळेस उपमुख्याध्यापिका सौ. विश्वासे,पर्यवेक्षक श्री. गडदे व प्रशालेतील सर्व ज्येष्ठ शिक्षक बंधू-भगिनी व कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान संस्थेच्या या अभिनव उपक्रमाबद्दल शिक्षण क्षेत्रातून आणि पालकांमधून पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे व कवठेकर प्रशालेचे कौतुक होत आहे.

---

## दत्तकला आयडियल स्कूल ॲन्ड ज्युनियर कॉलेज केतुरचे स्पर्धा परीक्षांमध्ये यश







**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.२३ मार्च-**

शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी म्हणून, त्यांना मंथन, स्कॉलरशिप, नवोदय, गुरुकुल आणि गणित मंडळ अशा विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांना विद्यार्थ्यांना बसवण्यात आले. त्यापैकी गणित मंडळ, गुरुकुल आणि नवोदय या परीक्षांचे निकाल नुकतेच जाहीर झाले. त्या परीक्षांमध्ये दत्तकला आयडियल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.

गणित प्राविण्य परीक्षेतून इयत्ता पाचवीची अनन्या अंबादास मिंड हिची २६ एप्रिल २०२६ रोजी सोलापूर येथे होणाऱ्या गणित प्रज्ञा परीक्षेसाठी निवड झाली. २५ जानेवारी २०२० रोजी गुरुकुल एज्युकेशन सोसायटी कोल्हापूर मार्फत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत इयत्ता सहावीच्या वेदांत संजय बाबर या विद्यार्थ्याने ३०० पैकी १९२ गुण मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला. तसेच इयत्ता चौथीची विद्यार्थिनी शिवकन्या रामहरी मोरे ३००पैकी २०० गुण मिळवून तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवला आहे. नवोदय विद्यालय समिती मार्फत घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत इयत्ता पाचवी चे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन केले आहे.

त्यामध्ये स्वरूप रवींद्र राऊत १०० पैकी ९५, अनन्या अंबादास मिंड शंभर पैकी ८८.७५, माऊली सिद्धेश्वर गोडगे १०० पैकी ७६.२५ गुण मिळवून यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल प्राचार्य विजय मारकड यांनी अभिनंदन केले.

---

## श्रीपतपिंपरीत महिलेला मारहाण करत चावल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २३ मार्च-**

तालुक्यातील श्रीपतपिंपरी येथे किराणा दुकान चालविणाऱ्या एका महिलेला दगडाने मारहाण करून जखमी केल्याची घटना २१ मार्च रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी संबंधित महिलेने बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

जखमी जना पप्पु पवार (वय ३९, रा. इंदिरा नगर, श्रीपतपिंपरी) या आपल्या विजय किराणा स्टोअर्स या दुकानात बसलेल्या असताना गावातील सोन्या उर्फ रणजीत बाळासाहेब पाटील हा त्यांच्या दुकानासमोर आला. पूर्वी झालेल्या वादाच्या कारणावरून त्याने पवार यांच्याशी शिवीगाळ सुरू केली. पवार यांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने जवळील खडीच्या ढिगाऱ्यातील दगड उचलून त्यांच्या डोक्यावर फेकला. यात त्या जखमी झाल्या. त्यानंतर आरोपीने त्यांना मारहाण करून डाव्या हाताच्या पोटरीला चावा घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

घटनेनंतर आरोपीने पुन्हा आमच्या नादी लागली तर जिवे ठार मारीन अशी धमकी देत तेथून पळ काढला. जखमी महिलेने पतीला फोन करून घटनेची माहिती दिली. त्यानंतर त्या पतीसह पोलीस ठाण्यात गेल्या. पोलिसांनी त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात पाठविले.

प्राथमिक उपचारानंतर मानसिक स्थिती ठीक नसल्याने त्यांनी तत्काळ तक्रार दिली नाही. मात्र, दुसऱ्या दिवशी नातेवाईकांसह पोलीस ठाण्यात येऊन त्यांनी अधिकृत तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणी बार्शी तालुका पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

---

## 'शाळा-कॉलेज तिथे नाटक'चा उत्सव आजपासून

### शितलदेवी धैर्यशील मोहिते पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ मार्च-**



नवी पिढी आणि थोर मराठी नाट्य परंपरा यांचा दुवा साधण्यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई शाखा: अकलूज यांच्या वतीने 'शाळा-कॉलेज तिथे नाटक' हा अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी मोहिमेचे संपूर्ण नियोजन आणि वेळापत्रकाची माहिती शितलदेवी धैर्यशील मोहिते पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये नाटकाची गोडी निर्माण करणे आणि त्यांच्यातील सुप्त अभिनय गुणांना व्यासपीठ मिळवून देणे हा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कोल्हापूरचे प्रसिद्ध दिग्दर्शक संजय हळदीकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण उपक्रम साकारला जात आहे. त्यांना नागनाथ साळवे, सुरज ननवरे, सयाजी मगर आणि मोतीराम वाघमोडे यांचे तांत्रिक सहकार्य लाभणार आहे.

या कार्यक्रमासाठी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांचे मार्गदर्शन लाभले असून प्रत्यक्ष नियोजन आणि संकल्पना आणि यशस्वी आयोजनासाठी अजय तपकिरे, सुनील कांबळे, अमित पुंज, औदुंबर भिसे आणि विश्वनाथ आवड हे परिश्रम घेत आहेत.

नाट्य संस्कृतीचा वारसा जपणे ही काळाची गरज असून, या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमधून भविष्यातील उत्तम कलाकार घडू शकतील, असा विश्वास शितलदेवी मोहिते पाटील यांनी यावेळी व्यक्त केला. या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह पालकांनीही मोठ्या संख्येने प्रतिसाद द्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

#### सविस्तर उपक्रमाचे पाच दिवसांचे वेळापत्रक

**२४ मार्च:** सकाळी ९:०० वाजता जिल्हा परिषद किल्ला शाळा (अकलूज), सकाळी १०:०० वाजता जि. प. शाळा (शंकरनगर) आणि सकाळी ११:३० वाजता शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूल (शंकरनगर)

**२५ मार्च:** सकाळी ९:३० वाजता जि. प. शाळा (कचरेवाडी) आणि सकाळी ११:०० वाजता शंकरराव मोहिते महाविद्यालय (अकलूज)

**२६ मार्च:** सकाळी ९:३० वाजता गुरुकुल (अकलूज)

**२७ मार्च:** सकाळी ९:०० वाजता जि. प. शाळा (२१ खोल्या) आणि सकाळी १०:३० वाजता जि. प. शाळा (तरंगफळ)

**२८ मार्च:** मोहिमेच्या शेवटच्या दिवशी सकाळी ९:०० वाजता माढा कॉलेज (माढा) आणि सकाळी ११:०० वाजता यशोदा गुरुकुल (अरण) येथे प्रयोगांचे आयोजन

---



## कुरुल येथे इफ्तार पार्टी उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**कुरुल, दि. २३ मार्च-**

रमजान सणानिमित्ताने मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट मोहोळ) तालुकाध्यक्ष अण्णासाहेब पाटील यांच्या वतीने, तसेच राजमुद्रा प्रतिष्ठान कुरुल यांच्या सहकार्याने करण्यात आले.

या कार्यक्रमास राजमुद्रा हॉटेलचे मालक माऊली निकम, प्रगतशील द्राक्ष बागायतदार गुरुदेव पाटील, हॉटेल जगदंबाचे मालक संतोष माने, योगेश भैय्या जाधव, समाधान साळुंखे, कुरुल ग्रामपंचायत सदस्य शरद गोरे, सहदेव सुतार, भीमराव गायकवाड, उमेश गोसावी, सिकंदर बागवान, बबलू शेख, सलीम शेख आदी उपस्थित होते. या प्रसंगी सर्व उपस्थितांनी एकत्र येत बंधुभाव, ऐक्य आणि सामाजिक सलोखा जपण्याचा संदेश दिला. यावेळी अण्णासाहेब पाटील यांच्या वतीने रमजान ईदच्या शुभेच्छा देताना त्यांनी सांगितले-ईद घेऊन येई आनंद,जोडू मनामनांचे बंध,सणाचा हा दिवस खास,ईद मुबारक तुम्हा सर्वांस! अशा शब्दांत उपस्थितांना रमजान ईद मुबारकच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लक्ष्मी सरवदे यांना छत्रपती शिवाजी महाराज ज्ञानदीप गौरव पुरस्कार



**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.२३ मार्च-**

करमाळा तालुक्यातील घारगाव ग्रामपंचायतीच्या ग्रामपंचायत सदस्या तथा माजी सरपंच लक्ष्मी संजय सरवदे यांना सामाजिक, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, प्रशासन यामध्ये एकात्मिक दृष्टिकोन ठेवून केलेल्या कार्यामुळे ज्ञानदीप सामाजिक विकास संस्था महाराष्ट्र यांच्या मार्फत २०२६ चा राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. निवड पत्र अध्यक्ष डॉक्टर अनिल आठवले यांनी दिले आहे

हा गौरवाचा सोहळा रोटरी क्लब सभागृह नाशिक या ठिकाणी पार पडणार आहे या पुरस्कार समारंभाचे आयोजन ज्ञानदीप सामाजिक विकास संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या कडून करण्यात आले आहे.

सरपंच सरवदे यांना ग्रामस्थ, सामाजिक संस्था पासून राजकीय, प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या पुढील कार्यासाठी सर्व स्तरातून प्रोत्साहन दिले जात आहे.



### महत्त्वाचे



## श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानातील सत्कार जीवनातील गौरव : न्यायमूर्ती कर्णिक

**अक्कलकोट दि २३ मार्च-**

सर्वसामान्य स्वामी भक्तांप्रमाणे मीही स्वामी भक्त आहे. याच स्वामी भक्तीच्या माध्यमातून अक्कलकोटला आल्यानंतर समर्थांनी स्वामी दर्शनाची संधी वेळोवेळी देत रहावी. या माध्यमातून स्वामी कृपेचे वरदहस्त माझ्या व माझ्या कुटुंबीयांवर कायम रहावी याकरिता आज येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन स्वामी समर्थांचे दर्शन घेतले आहे.दर्शनानंतर लाभलेलं येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील विश्वस्त समितीच्या वतीने महेश इंगळे यांच्या हस्ते झालेला सत्कार म्हणजे जीवनातील मोठा गौरव असल्याचे मनोगत मुंबई उच्च न्यायालय कोल्हापूर खंडपीठाचे न्याय मूर्ती एम.एस.कर्णिक यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी मुंबई उच्च न्यायालय कोल्हापूर खंडपीठाचे न्यायमूर्ती एम.एस.कर्णिक व मुंबई उच्च न्यायालय मा.न्यायमूर्ती सुमन श्याम साहेब यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी बोलताना न्यायमूर्ती एम.एस.कर्णिक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मंदिर समितीचे विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, गिरीश पवार, विपुल जाधव, रवी मलवे, श्रीकांत मलवे, प्रसाद सोनार, महेश मस्कले, दर्शन घाटगे इत्यादी उपस्थित होते.



## माळशिरस पंचायत समितीचे नुतन सभापती मगर व उपसभापती पाटील यांचा सन्मान

**पिलीव दि २३ मार्च-**

माळशिरस तालुका पंचायत समितीच्या सभापतिपदी दत्तात्रय मगर तर उपसभापती पदी मनीषा अमोल मदने पाटील यांची निवड झाल्याबद्दल तसेच निमगाव जिल्ह्य परिषद गटाच्या जिल्ह्य परिषद सदस्यपदी निलावती ठवरे यांची वेळापूर पंचायत समिती गणाच्या सदस्य पदी विमल जानकर, कण्हेर जिल्ह्य परिषद गटाच्या सदस्यपदी गौतम माने तर गोरवडवाडी पंचायत समीती सदस्यपदी रेशमाताई माने या निवडुन आल्याबद्दल कुसमोड येथे या सर्वांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कुसमोड चे सरपंच शहाजी लेंगरे, नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, माजी सरपंच महावीर धायगुडे, पिलीवचे माजी सरपंच अमोल मदने पाटील, झिंजेवस्तीचे सरपंच राहुल जावळे, जिवन जानकर, माजी सभापती मच्छिंद्र ठवरे, बाबासाहेब माने शहाजी लेंगरे, गणेश लेंगरे, अंकुश लेंगरे, नाना लेंगरे, अर्जुन वाघ, विश्वास धायगुडे, बाळकृष्ण धायगुडे, वसंत लेंगरे, नबाजी मदने ,लहु पाटील, बापुराव मगरसह पिलीव, झिंजेवस्ती, कुसमोड परिसरातील अनेक मान्यवर या कार्यक्रमास मउपस्थित होते. यावेळेस नुतन सभापती दत्तात्रय मगर यांनी कुसमोड गावच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगीतले. कुसमोड गावच्या अडी अडचणी प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन यावेळी त्यांनी दिले.

## अरण येथे आयुष आरोग्य तपासणी व उपचार शिबीर; ८२ जणांची तपासणी

**मोडनिंब, दि २३ मार्च-**

महाराष्ट्र शासन व जिल्हा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यम ने राष्ट्रीय आयुष अभियानांर्गत आयुष आरोग्य तपासणी व उपचार शिबिरात सुमारे ८२ रुग्णांनी सहभाग नोंदवला, अशी माहिती डॉ. प्रदीप पाटील यांनी दिली.जिल्हा परिषद सदस्या वंदना कांबळे, पंचायत समिती सदस्या प्राजक्ता पाटील, सरपंच सुरत्नप्रभा ताकतोडे, माजी समाजकल्याण सभापती शिवाजी कांबळे, माजी बांधकाम सभापती भारत शिंदे, ॲड. विजय शिंदे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ सागर गायकवाड, वैद्यकिय अधिकारी हर्षद गायकवाड, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. योगिता माने, डॉ. सुप्रिया शेळके आदी उपस्थित होते. राष्ट्रीय आयुष्य अभियानांतर्गत शासनातर्फे मोफत आयुर्वेदिक औषोधोपचार केले जातात. रुग्णांनी मोठ्या प्रमाणात फायदा घ्यावा, आशा सेविकांनी आयुर्वेदाच्या प्रसारात योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले. या शिबिरात नागरिकांची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले असून परिसरातील ग्रामस्थ व आजूबाजूच्या गावांतील रुग्णांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. माणसाला होणाऱ्या सर्व मानसिक आणि शारीरिक आजारावर आयुर्वेदात खात्रीशीर उपचार उपलब्ध आहेत, अशी माहिती यावेळी उपस्थित रुग्णांना देण्यात आली. या शिबिरामुळे नागरिकांना आरोग्य तपासणी व उपचाराची सुविधा उपलब्ध झाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

# जिल्हा परिषदेत नव्या नेतृत्वाचा उदय; सभापती पदांसाठी जोरदार चढाओढ

## ● अक्कलकोट, माढा, मोहोळ, मंगळवेढ्याला मिळणार संधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च**

जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीनंतर आता सर्वांचे लक्ष सभापती निवडीकडे लागले असून, २७ मार्च रोजी या निवडीचा मुहूर्त निश्चित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेत राजकीय हालचालींना वेग आला आहे. भाजपने बार्शी तालुक्यातील शेतकरी नेते दीपक वैद्य यांना अध्यक्षपदाची, तर निष्ठावान कार्यकर्ते इंद्रजित पवार यांना उपाध्यक्षपदाची संधी देत सत्तेवर आपली पकड मजबूत केली आहे. आता उर्वरित सभापती पदांवर कोणाची वर्णी लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

बार्शी व उत्तर सोलापूर या दोन तालुक्यांना आधीच प्रमुख पदे मिळाल्यामुळे उर्वरित चार सभापती पदे अक्कलकोट, माढा, मोहोळ आणि मंगळवेढा या तालुक्यांना मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. जिल्हा परिषदेच्या इतिहासात पंढरपूर व माळशिरस तालुक्यांना नेहमीच सत्तेतील महत्त्वाची पदे मिळत



आली आहेत. मात्र, यंदा भाजपने राष्ट्रवादीची सत्ता उलथवून टाकत एकहाती सत्ता स्थापन केल्यानंतर समीकरणे बदलली आहेत. यामुळे या दोन तालुक्यांना सत्तेतील पदे तर मिळणार नाहीतच, पण विरोधी पक्षनेतेपदही मिळेल की नाही, याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. परिणामी, दीर्घकाळ सत्तेत असलेले हे तालुके यंदा सत्तेपासून दूर राहण्याची शक्यता आहे.



दरम्यान, शांभवी कल्याणशेट्टी यांनी संधी नाकारल्यास दक्षिण तालुक्यातील पर्यायी महिला सदस्याचा विचार केला जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यांसह महिला बालकल्याण व समाजकल्याण या महत्त्वाच्या समित्यांची धुरा महिला सदस्यांकडे सोपविण्याची शक्यता आहे. त्यामुळे महिला नेतृत्वालाही यंदा मोठी संधी मिळण्याचे संकेत आहेत. यासंदर्भात सभापती निवडीपूर्वी पुढील दोन दिवसांत पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार व माजी आमदार यांची बैठक होणार आहे. या बैठकीत अंतिम नावांवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. जिल्हा परिषदेत सत्तांतरानंतर आता सभापती निवड ही पुढील महत्त्वाची पायरी ठरणार आहे. नव्या चेहऱ्यांना प्राधान्य, तालुक्यांतील सम तोल आणि राजकीय समीकरणे यांचा विचार करून होणारी ही निवड जिल्हा राजकारणाला नवी दिशा देणारी ठरणार आहे.

### नव्या चेहऱ्यांना प्राधान्य

भाजपने जिल्हा परिषदेत नव्या व तरुण नेतृत्वाला संधी देण्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीतूनच याची झलक दिसून आली असून, सभापती निवडीतही त्याच धोरणाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे. उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांच्याकडे अर्थ व बांधकाम या महत्त्वाच्या विभागांची जबाबदारी सोपविण्यात येणार आहे. तर शिक्षण, आरोग्य, कृषी व पशुसंवर्धन या विभागांवरही नवीन चेहऱ्यांना संधी दिली जाणार आहे.



### सभापती पदासाठी ही नावे आहेत चर्चेत

**अक्कलकोट :** आ.कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवी कल्याणशेट्टी
**माढा :** माजी सभापती शिवाजी कांबळे यांच्या पत्नी वंदना कांबळे
**मंगळवेढा :** आमदार समाधान आवताडे यांच्या समर्थकाला संधी
**मोहोळ :** राजन पाटील गटाकडून नाव निश्चित होण्याची शक्यता

## विठ्ठल रुक्मिणीमातेच्या पूजेची २५ मार्चपासून ऑनलाईन नोंदणी

### ▸▸ कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ मार्च -**

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यपुजा, पाद्यपूजा व तुळशी अर्चन पूजा आदी सर्व प्रकारच्या पूजा श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. १ एप्रिल ते ३१ जुलै २०२६ या कालावधीतील पुजांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात २५ मार्च रोजी स.११ पासून होत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, पाद्यपूजा व महानैवेद्य सहभाग योजना तसेच माहे एप्रिल, २०२६ मधील तुळशी अर्चन पूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. मंदिर समितीच्या ३ मार्च रोजी सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. भाविकांना पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे.

७ ऑक्टोबरपासून श्रींच्या नित्यपूजा, तुळशी अर्चन पूजा व पाद्यपूजा टप्प्याटप्प्याने ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व



| श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या पुजेसाठीचे देणगी मुल्य |
|---|
| नित्यपूजेसाठी अनुक्रमे २५ व ११ हजार |
| पाद्यपूजेसाठी रू.५ हजार |
| तुळशी अर्चन पूजेसाठी २ हजार १०० |
| महानैवेद्य सहभाग योजनेसाठी ७ हजार |

देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली होती. ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल. याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६-२९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा अशी माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.



## आयशर गाडीतील लोखंडी रॉडने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

गाडीचे ५ हजार रुपये म्हणून लोखंडी रॉडने मारहाण केल्याची घटना घडली आहे.

अनिल म्हंतप्पा शीर्षीकर (वय ४५, रा. रविवार पेठ, सोलापूर) हे बनशंकरी मंदिराजवळ थांबले असता, आरोपी विशाल नागनाथ कोळी, निशांत कोळी, जज्या कोळी (सर्व रा. शेळगी) हे आले व विशाल कोळी याने अनिल यांना हे पैसे मागितले. त्यावेळी तू माझ्या आयशर गाडीचा टायर दे मी तुला पैसे देतो असे सांगितले असता विशालने शिवीगाळ करीत हाताने लाथाबुक्याने अनिल यांना मारहाण केली. अनिल हे खाली पडल्यावर विशाल याने तिथे थांबलेल्या आयशर गाडीतून लोखंडी रॉड आणून फिर्यादीच्या डोक्यात, पाठीमागे मारून तसेच हातातील कड्याने अनिल यांच्या छातीस मारहाण करून जखमी केले. याबाबत २२ मार्च रोजी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास वाघमारे करत आहेत.

## पैशांची मागणी : आरोग्य विभागाचा निष्काळजीपणा



### संबंधित आधिकाऱ्याला निलंबित करा : आमदार अभिजीत पाटील यांची अधिवेशनात मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ मार्च -**

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेच्या अंमलबजावणीतील गंभीर त्रुटींवर माढा विधानसभेचे आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला.



सर्पदंशा सारख्या जीवघेण्या आजारासाठी लागणाऱ्या महागड्या इंजेक्शनचा खर्च मोठा असल्यामुळे अनेक रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती मांडली. आत्महत्येच्या प्रकरणांनाही या योजनेत समाविष्ट करण्यात यावे, तसेच अपेंडिक्ससारख्या साध्या शस्त्रक्रियांसाठीही रुग्णांना प्रतीक्षा करावी लागत असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

सरकारी रुग्णालयांपुरती मर्यादित असलेली ही योजना खाजगी रुग्णालयांम ध्ये प्रभावीपणे राबवली गेल्यास सर्वसाम न्यांना अधिक चांगल्या सुविधा मिळू शकतात. मात्र, सोलापूर जिल्ह्यात सम न्वयक नागराज गुजरे यांच्याकडून पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारीमुळे अनेक रुग्णालये ही योजना स्वीकारण्यास तयार नसल्याची बाबही निदर्शनास आणून दिली.

या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करण्याची मागणी करण्यात आली. तसेच सर्पदंशासाठीचे पॅकेज वाढविणे आणि आत्महत्येच्या प्रकरणांचा योजनेत समावेश करण्याबाबत ठोस निर्णय घेण्याचीही मागणी आमदार पाटील यांनी केली.

**आरोग्यमंत्री आबिटकर यांचे चौकशीचे आदेश**

दरम्यान यावर आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी उत्तर देताना सांगितले, राज्याच्या या महत्वाकांक्षी योजनेत कोणतीही गैरप्रकार सहन केली जाणार नाही, असे स्पष्ट करत संबंधित प्रकरणाची एक आठवड्यात चौकशी करून तात्काळ कारवाई करण्यात येईल, तसेच संबंधित अधिकाऱ्याचा कार्यभार काढून घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# जिल्ह्यातील सर्वच साखर कारखान्यांची धुराडी बंद

## १५९ लाख ८० हजार मेट्रिक टन ऊस गाळप | १४१ लाख ५७ हजार क्विंटल साखर उतारा

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

१ नोव्हेंबर २०२५ ला ऊस गाळप हंगाम सुरू झाला आणि अवघ्या ३ ते सव्वातीन महिन्यात सोलापूर, सांगली जिल्ह्यासह महाराष्ट्रात साखर कारखाने बंद (धुराडी बंद) झाली आहेत. सोलापुरात आजतागायत सर्व साखर कारखाने बंद झाले आहेत. दरम्यान, जिल्ह्यातील खाजगी आणि सहकारी साखर कारखान्यातून आजतागायत १५९ लाख ८० हजार १६६ मे. टन उसाचे गाळप झाले असून, १४१ लाख ५७ हजार २११ क्विंटल साखरेचे उत्पन्न झाले आहे. दरम्यान, यंदा अतिवृष्टी अन् महापुराने शेतकरी बांधवांसह साखर कारखानदारांचेही मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, गतवर्षी उशिराने बिले अदा केलेल्या साखर कारखान्यांकडे यंदा ऊस उत्पादकांनी पाठ फिरविल्याने त्यांना गाळपासाठी ऊस मिळविताना तारेवरची कसरत करावी लागली.

१५ मार्चपर्यंत सर्वच साखर कारखान्यांची धुराडी बंद झाली आहेत. यावर्षी अतिवृष्टी आणि महापुराचा ६ तालुक्यातील नदीकाठच्या उसाला फटका बसल्याने उसाचे उत्पादन कमी झाले आहे आणि अती पाण्यामुळे उताराही चांगला पडला नाही. जिल्ह्यातील १२ सहकारी





साखर कारखान्यांमध्ये आजतागायत ६६ लाख ४० हजार ९४१ मेट्रीक टन ऊस गाळप होवून ५८ लाख ८० हजार २५५ क्विंटल साखर उत्पादन झाले आहे. तर साखर उतारा ८.८५ टक्के झाला. तर जिल्ह्यातील खाजगी साखर कारखान्यांमध्ये ९३ लाख ३९ हजार २२५ मे. टन ऊस गाळप झाला आणि साखर उत्पन्न ८२ लाख ७६ हजार ९५६ क्विंटल झाले. तर निव्वळ साखर उतारा ८.८६ टक्के इतका झाला. एकूण ३५ साखर कारखान्यांमध्ये आजतागायत १५९ लाख ८० हजार १६६ मे. टन उसाचे गाळप झाले असून, १४१ लाख ५७ हजार २११ क्विंटल साखरेचे उत्पन्न झाले आहे. तर साखर उतारा सरासरी ८.८६ टक्के इतका झाला आहे. म्हणजेच गतवर्षीपेक्षाही हा उतारा कमीच आहे. यंदा गाळप हंगाम लवकर आटोपल्यामुळे म गील शेतकऱ्यांना उसाच्या वाहतुकीसाठी चांगलीच धावपळ करावी लागली. दरम्यान, ऊस तोड करणारे सर्व कामगारही गावी मार्गस्थ झाले आहेत.

**शेतकऱ्यांची बिले अगोदर द्यावीत**

साखर कारखानदारांकडून जिल्ह्यात आजतागायत कोट्यवधींची शेतकऱ्यांची बिले थकल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटना पदाधिकाऱ्यांनी नुकताच केला होता. प्रतिवर्षी हाच प्रकार समोर येत आहे. काही कारखाने जानेवारी अखेर शेतकऱ्यांची बिले देतात मात्र उर्वरित साखर कारखानदार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना लवकर पैसे देत नाहीत. यामुळे बँकांची कर्जाची देणी साखर कारखाना प्रशासनाने देण्यापूर्वी शेतकऱ्यांची बिले अगोदर देण्याचा कायदाच शासनाकडून पारीत करण्यात यावा, अशी अपेक्षा काही शेतकरी संघटना पदाधिकाऱ्यांनी दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना व्यक्त केली.

### अतिवृष्टीने वजन अन् उताराही घटला!

शेवटच्या टप्प्यात गाळपासाठी पुरेसा ऊस उपलब्ध न झाल्यामुळे राज्यातील साखर कारखाने वेळेआधीच बंद पडले आहेत. तर सोलापूर जिल्ह्यात गतवर्षीच्या हंगामात दुष्काळामुळे ऊस कमी असला तरी सरासरी साखर उतारा चांगला पडला होता. यंदा उसाचे क्षेत्र जास्त होते मात्र जास्तीच्या पाण्यामुळे निव्वळ साखर उतारा कमी झाला आहे. उसाला जास्तीचे तुरे आल्याने वजन भरले नाही आणि उसाच्या फक्त बुडाला जास्तच पाण्याचे प्रमाण होते. यंदा ६ तालुक्यातील नदीकाठच्या उसालाही सीना-भीमा नदीच्या महापुराचा मोठा फटका बसल्याने तोही ऊस गाळपास सापडला नाही. एकंदरीत, अतिवृष्टी आणि उसाला लवकरच तुरे आल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आणि सरासरी साखर उतारा कमी पडल्याने कारखानदारांचे नुकसान झाले.

**- प्रकाश आष्टेकर,**
**प्रादेशिक संचालक, पुणे विभाग**